## आजचे पंचांग

सोमवार दि. ११ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, कृष्णपक्ष, नवमी दुपारी ३-२५ पर्यंत नंतर दशमी तिथी, दिवस नक्षत्र– शततारा रात्री १-२९ पर्यंत नंतर पूर्वाभाद्रपदा, चंद्र रास - कुंभ, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## धर्मकार्यात लुडबूड नको

**मुंबई:** हिंदू धर्माच्या प्रचार, प्रसारासाठी काम करणाऱ्या प्रबोधकार, कीर्तनकार आणि संतांचा आदर ठेवलाच पाहिजे. विकास लवांडे यांच्याबाबत ह.भ.प. संग्रामबापू भंडारे यांनी केलेल्या शाईफेकीचे आम्ही जाहीर समर्थन करतो, असे भूमिका भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केली. "वारकरी सांप्रदायातील २० घुसखोर" अशी टीका करीत शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी जाहीरपणे केली होती. त्यामुळे हिंदुत्ववादी संस्था, संघटनांमधून निषेध व्यक्त होत होता.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. ११ मे, २०२६ | वर्ष - १ अंक - २२५ पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### वंदे मारतरम् आधी तमिळ राज्यगीत वाजवा

**चेन्नई :** शासकीय समारंभांच्या शिष्टाचारामध्ये तमिळ थाई वाझथू या तामिळनाडूच्या राज्यगीताला अग्रस्थान दिले पाहिजे, असे सीपीआयचे राज्य सचिव एम. वीरपांडियन यांनी सांगितले. जोसेफ विजय यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. यावेळी सोहळ्याची सुरुवात वंदे मातरम या राष्ट्रीय गीताने झाली. त्यानंतर जन गण मन हे राष्ट्रगीत वाजवण्यात आले. त्यानंतर तमिळ थाई वाझथू हे गीत वाजवण्यात आल्याने वादाला तोंड फुटले आहे.

### द्रमुक नेतेपदी उदयनिधी यांची निवड

**चेन्नई :** द्रमुकने माजी उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन यांची विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड केली आहे. द्रमुकचे माजी मंत्री आणि ज्येष्ठ नेते के. एन. नेहरू यांची विधिमंडळ पक्षाचे उपनेते म्हणून निवड करण्यात आली आहे, अशी माहिती पक्षाच्या सूत्रांनी रविवारी दिली. द्रमुकचे माजी मंत्री ई. व्ही. वेलू यांची पक्षाचा प्रतोद म्हणून निवड करण्यात आली आहे. द्रमुकचे ५९ आमदार आहेत आणि ते सभागृहात मुख्य विरोधी पक्ष म्हणून काम करतील. तामिळनाडू विधानसभेत २३४ सदस्य आहेत.

### जधानी दिल्लीत ३७.९ तापमानाची नोंद

**नवी दिल्ली :** दिल्लीत रविवारी कमाल तापमान ३७.९ अंश सेल्सिअस नोंदले गेले. किमान तापमान २६.२ अंश सेल्सिअस नोंदले गेले, जे हंगामी सरासरीपेक्षा १.१ अंश जास्त आहे. हवामान खात्याने सोमवारी जोरदार वाऱ्यासह हलका ते हलका पाऊस पडण्याचा अंदाज वर्तविला आहे, कमाल आणि किमान तापमान अनुक्रमे ३९ अंश सेल्सिअस आणि २६ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता आहे.

## तेल संकटाच्या पार्श्वभूमीवर मोदींचे आवाहन

# पेट्रोल-डिझेलचा वापर संयमाने करा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**हैदराबाद :** पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक तेलपुरवठ्यावर गंभीर परिणाम होत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना इंधन बचतीचे महत्त्व पटवून देत पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा वापर अत्यंत संयमाने करण्याचे आवाहन केले. तेलंगणातील हैदराबाद येथे रविवारी आयोजित कार्यक्रमात सुमारे ९ हजार ४०० कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे उद्घाटन आणि लोकार्पण करताना त्यांनी देशाच्या ऊर्जा सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण भाष्य केले.

अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढत्या संघर्षामुळे जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या पुरवठ्याची साखळी विस्कळीत झाली आहे. जगातील सर्वात महत्त्वाचा तेलवाहतूक मार्ग मानल्या जाणाऱ्या 'होर्मुझ सामुद्रधुनी'वरील तणावामुळे भारतासारख्या आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या देशांसमोर गंभीर आव्हान निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी म्हणाले की, "आजची परिस्थिती लक्षात घेता प्रत्येक नागरिकाने इंधनाचा वापर जबाबदारीने करणे आवश्यक आहे. आयात केलेल्या पेट्रोलियम उत्पादनांचा वापर केवळ अत्यावश्यक असेल तेव्हाच करावा. त्यामुळे देशाचे परकीय चलन वाचेल आणि जागतिक संकटाचा आपल्या अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम कमी करण्यास मदत होईल."

पंतप्रधानांनी यावेळी भारताच्या ऊर्जा आत्मनिर्भरतेच्या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांचाही उल्लेख केला. भारत आज सौरऊर्जा निर्मितीत जगातील आघाडीच्या देशांमध्ये पोहोचला असल्याचे त्यांनी सांगितले. आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सरकारने पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण वाढवण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच उज्ज्वला योजनेद्वारे ग्रामीण भागात गॅस कनेक्शन उपलब्ध करून दिल्यानंतर आता स्वस्त पाइप गॅस पुरवठ्यालाही चालना दिली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

देशभरात सीएनजी जाळ्याचा विस्तार वेगाने सुरू असून, प्रदूषण कमी करण्यासोबतच नागरिकांना तुलनेने स्वस्त इंधन उपलब्ध करून देण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचेही मोदी यांनी सांगितले. ऊर्जा सुरक्षेसोबतच पर्यावरण संवर्धन आणि दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य यांचा विचार करून सरकार विविध पर्यायी ऊर्जा प्रकल्पांना प्रोत्साहन देत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

दरम्यान, जागतिक अस्थिरतेच्या काळात देशाने ऊर्जा बचत आणि आत्मनिर्भरतेचा मार्ग स्वीकारणे गरजेचे असल्याचा संदेश देत मोदी यांनी नागरिकांना जबाबदारीने इंधन वापरण्याचे आवाहन केले.

# पुतीन यांची युद्ध संपवण्यासाठी तयारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मॉस्को :** व्लादिमिर पुतिन यांनी युक्रेन युद्धाबाबत महत्त्वपूर्ण संकेत देत, युद्ध पूर्णपणे संपवण्यासाठी वोलोदिमिर झेलेन्स्की यांची तिसऱ्या देशात भेट घेण्याची तयारी दर्शवली आहे. रशियाबाहेर चर्चेसाठी तयार असल्याचे पुतिन यांनी प्रथमच स्पष्टपणे म्हटले आहे. विक्टरी डे परेडनंतर माध्यमांशी संवाद साधताना पुतिन म्हणाले की, त्यांनी कधीही युक्रेनच्या राष्ट्राध्यक्षांसोबत चर्चेला नकार दिलेला नाही. मात्र, तिसऱ्या देशात बैठक होण्यासाठी दोन्ही देशांमध्ये दीर्घकालीन आणि पूर्ण शांतता करार निश्चित होणे आवश्यक असल्याची अट त्यांनी ठेवली.

पुतिन यांच्या मते, राष्ट्राध्यक्षांची भेट ही केवळ अंतिम टप्प्यातील औपचारिकता आणि करारावर स्वाक्षरी करण्यापुरती असावी. प्राथमिक आणि सविस्तर चर्चा तज्ज्ञ पातळीवर आधी पूर्ण होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. "ही बैठक चर्चेची सुरुवात नसून अंतिम निष्कर्षासाठी असावी," असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, युक्रेनकडून इच्छा व्यक्त झाल्यास झेलेन्स्की मॉस्कोमध्येही येऊ शकतात, असेही त्यांनी नमूद केले.

रशियन राष्ट्राध्यक्षांनी २०१४ आणि २०१५ मधील मिन्स्क कराराचा उल्लेख करत सांगितले की, त्या वेळी बेलारूसमध्ये झालेल्या चर्चांमध्ये अनेक तास चर्चा होऊनही ठोस निष्कर्ष निघाला नव्हता. डोनबास भागातील हिंसाचार थांबवण्याच्या उद्देशाने झालेले हे करार अखेर अपयशी ठरले होते. त्यामुळे यावेळी सर्व मुद्द्यांवर आधीच स्पष्टता असणे आवश्यक असल्याचे पुतिन यांनी सांगितले.

# खा. सुप्रिया सुळे यांच्या गाडीला अपघात; सर्वजण सुरक्षित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** सुप्रिया सुळे यांच्या गाडीचा पुणे-मुंबई महामार्गावर अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसून सुप्रिया सुळे आणि त्यांच्या वाहनातील सर्वजण सुरक्षित असल्याची माहिती मिळाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यावरून मुंबईकडे जात असताना एका भरधाव वाहनाने निष्काळजीपणे वाहन चालवत सुप्रिया सुळे यांच्या गाडीला बाजूने धडक दिली. अचानक झालेल्या या अपघातामुळे काही काळ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, कोणालाही गंभीर दुखापत झाली नाही. या घटनेनंतर स्वतः सुप्रिया सुळे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत अपघाताची माहिती दिली. त्यांनी संबंधित वाहनाचा क्रमांकही जाहीर केला. "जीजे १३ सीएफ ५२५७ या क्रमांकाच्या वाहनचालकाने अतिवेगाने आणि निष्काळजीपणे वाहन चालवत आमच्या गाडीला धडक दिली. सुदैवाने सर्वजण सुरक्षित आहोत. सीट बेल्ट लावला असल्यामुळे मोठा अनर्थ टळला," असे त्यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

महामार्गांवरील बेदरकार वाहनचालकांबाबत पुन्हा चिंता व्यक्त केली जात आहे. अतिवेग, वाहतूक नियमांचे उल्लंघन आणि निष्काळजी वाहनचालना यामुळे दररोज अपघात घडत असल्याचे वास्तव पुन्हा अधोरेखित झाले आहे.

## गोळीबार प्रकरणी ९ जण अटकेत, १४ फरार

# खेड एसईझेडमध्ये क्रेनच्या ठेक्यावरून तुफान राडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** खेड एसईझेडमधील खेड सिटी औद्योगिक परिसरात क्रेनच्या ठेक्यावरून दोन गटांमध्ये गुरुवारी तुफान हाणामारी झाली. या वेळी लोखंडी रॉड, दगड आणि लाकडी फळ्यांनी एकमेकांवर हल्ला करण्यात आला. तसेच पिस्तुलातून गोळीबार झाल्याने औद्योगिक परिसरात एकच खळबळ उडाली. या प्रकरणी खेड पोलिस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले असून सुमारे २३ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. त्यापैकी ९ जणांना अटक करण्यात आली असून १४ जण फरार आहेत.



खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दावडी गावच्या हद्दीत असलेल्या एका कंपनीत क्रेन लावण्याच्या वादातून हा प्रकार घडला. ह्युंदाई कंपनीच्या उभारणीसाठी खेड सिटी परिसरात विकासकामे सुरू असून, त्या ठिकाणी पंकज रामदास दौंडकर (रा. कनेरसर, ता. खेड) यांच्या क्रेनद्वारे जनरेटर हलविण्याचे काम सुरू होते. याच वेळी संतोष गव्हाणे, अमोल गव्हाणे, स्वप्नील गव्हाणे, मंगेश गव्हाणे, सुरेश गव्हाणे, राहुल गव्हाणे, सुनील गव्हाणे (सर्व रा. दावडी, ता. खेड), तसेच संदेश गोरडे आणि उमेश गोरडे (रा. गोसासी, ता. खेड) यांच्यासह काही जण घटनास्थळी पोहोचले.

या गटाने काम बंद करण्याची मागणी करत अक्षय बंदावणे, सोहम लोखंडे, साहिल मुळे आणि गणेश दरेकर यांना लोखंडी रॉड, स्टील रॉड आणि दगडांनी मारहाण केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या प्रशांत चौधरी यांनाही मारहाण करण्यात आली. तसेच पंकज दौंडकर यांच्या चारचाकी वाहनाची तोडफोड करून काचा फोडण्यात आल्या. याच वेळी संदेश गोरडे याने जीवे मारण्याच्या उद्देशाने दोन गोळ्या झाडल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

दुसरीकडे, स्वप्नील विलास गव्हाणे (रा. दावडी, ता. खेड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, पंकज दौंडकर, प्रशांत चौधरी, गणेश दरेकर, अक्षय बंदावणे, ऋतिक तांबे, दादा बोरकर, सोहम लोखंडे, साहिल मुळे आणि भूषण दौंडकर हे लोखंडी रॉड, दगड आणि लाकडी फळ्या घेऊन घटनास्थळी आले होते. त्यांनी अमोल गव्हाणे, सुरेश गव्हाणे, मंगेश गव्हाणे आणि फिर्यादीला शिवीगाळ करत मारहाण केली. तसेच पंकज दौंडकर याने कंबरेला लावलेले पिस्तूल काढून "खेड सिटीमध्ये फक्त आमचेच काम चालणार, तुमचे काम बंद करा," अशी धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. गणेश दरेकर याने संतोष गव्हाणे यांच्या अंगावर वाहन घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या घटनेनंतर खेड एसईझेड परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. खेड पोलिसांनी दोन्ही गटांविरोधात गुन्हे दाखल केले असून ९ जणांना अटक करण्यात आली आहे. उर्वरित आरोपींचा शोध सुरू असून पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण पुढील तपास करत आहेत.

## एच-१ बी व्हिसाधारकांच्या किमान वेतनात वाढीचा प्रस्ताव

# भारतीयांना बसणार नव्या नियमाचा फटका?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिकेत नोकरी करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भारतीय व्यावसायिकांसाठी महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. अमेरिकेचे कामगार विभाग यांनी एच-1बी व्हिसाधारकांच्या किमान वेतनात तब्बल ३० टक्क्यांपर्यंत वाढ करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. अमेरिकन नागरिकांच्या रोजगार आणि वेतनहितांचे संरक्षण करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

कामगार विभागाच्या मते, सध्याचे वेतनमान जवळपास २० वर्षांपूर्वी निश्चित करण्यात आले होते आणि बदललेल्या आर्थिक परिस्थितीत ते आता अप्रासंगिक ठरत आहे. 'इम्प्रूव्हिंग वेज प्रोटेक्शन' या प्रस्तावाअंतर्गत एंट्री-लेव्हलपासून अनुभवी व्यावसायिकांपर्यंत सर्व चार वेतन श्रेणींमध्ये वाढ करण्याची तरतूद करण्यात आली आहे. प्रस्तावानुसार, एंट्री-लेव्हल (लेव्हल-१) कर्मचाऱ्यांसाठी किमान वेतन ७३,२७९ डॉलरवरून ९७,७४६ डॉलरपर्यंत वाढवले जाऊ शकते. तर सर्वाधिक अनुभवी व्यावसायिकांसाठी (लेव्हल-४) वेतन १,४४,२०२ डॉलरवरून १,७५,४६४ डॉलरपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. हा बदल केवळ एच-१ बी व्हिसा कार्यक्रमापुरता मर्यादित नसून एच- १बी१, ई-३ आणि पीईआरएम कार्यक्रम यांसारख्या रोजगाराधारित इमिग्रेशन योजनांनाही लागू होणार आहे.

तज्ज्ञांच्या मते, वेतनातील मोठ्या वाढीमुळे लहान आणि मध्यम कंपन्यांसाठी परदेशी उमेदवारांना, विशेषतः नवोदित आणि फ्रेशर्सना, नोकरी देणे कठीण होऊ शकते. त्यामुळे भारतीय आयटी आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तरुण व्यावसायिकांवर याचा थेट परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रस्तावावर २६ मेपर्यंत नागरिकांकडून हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या आहेत. त्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. यापूर्वी २०२० मध्ये ट्रम्प प्रशासनाने अशाच प्रकारे वेतन निकष बदलण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, कायदेशीर आव्हानांमुळे तो निर्णय लागू होऊ शकला नव्हता. सप्टेंबर २०२५ मध्ये राष्ट्राध्यक्षीय आदेशाद्वारे एच-१बी उमेदवारांवर एक लाख डॉलर शुल्क लावण्यात आले होते. प्रस्तावित वेतनवाढीमुळे अमेरिकेतील रोजगार संधी परदेशी व्यावसायिकांसाठी अधिक आव्हानात्मक बनण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### चर्चा म्हणजे शरणागती नव्हे

**नवी दिल्ली :** इराणने आज पाकिस्तानी मध्यस्थांमार्फत युद्ध संपवण्याकरता अमेरिकेला प्रस्ताव पाठवला असल्याचे वृत्त वृत्तसंस्थेने दिले आहे. यावरून इराणने अमेरिकेला इशारा दिला आहे. प्रस्ताव पाठवला म्हणजे शरण आलो आहे, असे नाही, असे इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी म्हटलंय. एक्सवरील पोस्टमध्ये ते म्हणाले, चर्चा किंवा वाटाघाटी म्हणजे शरणागती पत्करणे किंवा माघार घेणे नव्हे. इराणी जनतेचे हक्क सुरक्षित करणे आणि राष्ट्रीय हितांचे खंबीरपणे रक्षण करणे हा उद्देश आहे. बाधित कुटुंबांना मानसिक आधार देणे हे सरकारचे सर्वोच्च प्राधान्य आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

# नाशिकमध्ये 'तिहेरी तलाक'

## गर्भपातास कारणीभूत ठरलेल्या पतीविरुद्ध गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नाशिक :** देशात 'तिहेरी तलाक' प्रथा बेकायदेशीर आणि असंवैधानिक ठरवण्यात आल्यानंतरही नाशिकमध्ये अशाच प्रकाराची धक्कादायक घटना समोर आली आहे. पत्नीचा शारीरिक व मानसिक छळ करून अमानुष मारहाण केल्याने गर्भपात झाल्याचा आरोप असलेल्या पतीविरुद्ध मुंबई नाका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयित मलिक अशरफ समशेर (वय २८, रा. अल्फाद रेसिडेन्सी, पखाल रोड) हा दिंडोरी तालुक्यातील जऊळके परिसरात भंगार विक्रीचा व्यवसाय करतो. त्याने पीडित महिलेशी फेब्रुवारी २०२२ मध्ये नोंदणी पद्धतीने विवाह केला होता. विवाहानंतर सुरुवातीला संसार सुरळीत सुरू होता. मात्र, काही काळानंतर किरकोळ कारणांवरून पत्नीचा छळ सुरू करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. जानेवारी २०२५ मध्ये आरोपीने पीडितेला गंभीर मारहाण केल्याचे समोर आले आहे. या मारहाणीत तिच्या पोटातील गर्भाचा मृत्यू झाल्याचा आरोप आहे. त्यानंतर ३० जानेवारी रोजी आरोपीने पीडितेला मोबाईलवर फोन करून शिवीगाळ केली. तसेच "आज से तू हलाल नही, हराम हो गई... तलाक, तलाक, तलाक" असे म्हणत तिला तिहेरी तलाक दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

सततच्या छळाला कंटाळून पीडित महिलेने ८ मे रोजी संदीप कर्णिक यांची भेट घेत आपली तक्रार मांडली. पोलीस आयुक्तांनी तत्काळ कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पोलिसांनी भारतीय न्याय संहिता तसेच मुस्लिम महिला (विवाहाच्या अधिकारांचे संरक्षण) कायदा २०१९ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

## शासनाची सात सदस्यीय समिती नियुक्त

# हरणेश्वर साखर कारखाना प्रकरणाची चौकशी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील कळस येथील हरणेश्वर साखर कारखान्याच्या आर्थिक व्यवहारांतील कथित अनियमिततेची चौकशी करण्यासाठी राज्य शासनाने सात सदस्यीय समिती नियुक्त केली आहे. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने जारी केलेल्या आदेशानुसार पुण्याचे साखर आयुक्त या समितीचे अध्यक्ष असतील. समितीला एका महिन्याच्या आत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे कारखान्याच्या व्यवहारांभोवती निर्माण झालेल्या वादाला नवे वळण मिळाले आहे. दरम्यान, महसूल खात्याने पुरावे देऊनही, पोलिसांनी काहीच कारवाई न केल्याने, सरकारने समिती नेमण्याचा निर्णय घेतला, असे भाजप नेते आणि तक्रारदार माउली चवरे यांनी दैनिक राज्य लोकतंत्रशी बोलताना सांगितले. या चौकशीचे स्वागत करत माउली चवरे यांनी गंभीर आरोप केले आहेत. शेतकऱ्यांच्या मालकीचा आणि सध्याच्या घडीला सुमारे ३०० कोटी रुपये बाजारमूल्य असलेला कारखाना अवघ्या १३ कोटी रुपयांत विकण्याचा प्रयत्न झाल्याचा दावा त्यांनी केला. या प्रकरणातील आर्थिक व्यवहार, लिलाव प्रक्रिया आणि जमिनीच्या नोंदींमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. संपूर्ण प्रकरणाची विशेष तपास पथकाकडून (एसआयटी) चौकशी व्हावी, अशी मागणीही त्यांनी केली. वर्ष २००० मध्ये परिसरातील शेतकऱ्यांनी एकत्र येत ऊस आणि बीटापासून साखर तसेच इथेनॉल निर्मितीसाठी हरणेश्वर साखर कारखाना उभारण्याचा निर्णय घेतला होता. सुमारे १२ हजार ५०० शेतकऱ्यांनी मिळून १२ कोटी रुपयांचे भागभांडवल उभे केले. कारखान्यासाठी जवळपास २०० एकर जमीन खरेदी करण्यात आली, तर बँकेकडून ४५ कोटी रुपयांचे कर्ज घेण्यात आले होते. कारखाना सुरू झाला; मात्र आर्थिक आणि प्रशासकीय अडचणींमुळे तो नंतर अडचणीत सापडला. कारखाना वाचवण्यासाठी व्यवस्थापन आणि गुंतवणूकदारांकडून ८२ कोटी रुपयांच्या वन टाइम सेटलमेंटचा प्रस्ताव देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र हा प्रस्ताव फेटाळून अवसायकांकडून अवघ्या १३ कोटी रुपयांत लिलाव प्रक्रिया सुरू करण्यात आला. कारखान्याच्या मालकीच्या सुमारे १५० एकर जमिनीच्या पीक पाहणी अहवालात 'कारखाना पड' ऐवजी 'माळपड' असा बदल करण्यात आल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे जमिनीचे बाजारमूल्य कृत्रिमरीत्या कमी दाखवण्यात आल्याचा आरोप होत आहे. त्या काळातील रेडीरेकनरनुसार या जमिनीची किंमत सुमारे ६३ कोटी रुपये होती, तर सध्याच्या बाजारभावानुसार ती ११३ कोटी रुपयांहून अधिक असल्याचा दावा करण्यात येत आहे. माउली चवरे यांनी २०२१ पासून या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा केला आहे. महसूल अधिकारी, अवसायक आणि लिलाव प्रक्रियेशी संबंधित काहींनी संगनमत करून मूल्य कमी दाखवले आणि खासगी फायद्यासाठी कट रचल्याचा आरोप त्यांनी शासनाकडे केला होता. २०२५ मध्ये मुख्यमंत्री कार्यालयाकडे तक्रार दाखल झाल्यानंतर अखेर सहकार विभागाने चौकशी समिती नेमण्याचा निर्णय घेतला. या सात सदस्यीय समितीत पुण्याचे साखर आयुक्त अध्यक्ष म्हणून कार्यरत असतील. प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांची सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच बारामतीचे उपविभागीय अधिकारी, सह जिल्हा निबंधक पुणे, विभागीय उपनिबंधक इंदापूर, जिल्हा उपनिबंधक पुणे आणि बारामतीचे पोलिस निरीक्षक यांचाही समितीत समावेश करण्यात आला आहे.

# रुपालीताईंची खरात प्रकरणात सात तास चौकशी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नाशिक :** राज्याला हादरवून सोडणाऱ्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर यांची शनिवारी विशेष तपास पथकाने (एसआयटी) तब्बल सात तास चौकशी केली. या चौकशीदरम्यान अशोक खरात यांच्याशी असलेले संबंध, आर्थिक व्यवहार, पूजा-विधी आणि संस्थांमधील कामकाजाबाबत प्रश्न विचारण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

अशोक खरात प्रकरणाचा तपास अद्याप सुरू असून विविध गुन्ह्यांमध्ये पोलिसांनी त्याची कोठडी वाढवून घेतली आहे. यापूर्वी एसआयटीने रुपाली चाकणकर यांच्या बहिणीचीही चौकशी केली होती. पतसंस्थांमधील आर्थिक व्यवहारांबाबत तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले होते.

चौकशीनंतर रुपाली चाकणकर यांनी तपास यंत्रणांना पूर्ण सहकार्य केल्याचे सांगितले. "पोलिसांना आवश्यक असलेली सर्व माहिती मी दिली आहे. एसआयटीसमोर सविस्तर भूमिका मांडली असून चौकशीसंदर्भातील माहिती पुढे समोर येईल," असे त्या म्हणाल्या. सूत्रांच्या माहितीनुसार, चौकशीदरम्यान एसआयटीने अशोक खरात यांच्याशी संबंध केव्हापासून होते, शिवनिका संस्थांमधील कामकाजाची माहिती होती का, तसेच पूजा-विधींच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार झाले का, याबाबत प्रश्न विचारले. खरात यांच्या मंदिरात येणाऱ्या इतर राजकीय व्यक्तींविषयीही माहिती विचारण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

## संपादकीय

### पडद्यामागचे वास्तव



**तमिळनाडूच्या राजकीय पटलावर रुपेरी पडद्याचे गारूड कायम असले तरी थलपती विजयचा राज्याभिषेक हा प्रस्थापित द्रविडी राजकारणातील साचलेपणाला दिलेले एक मोठे आव्हान आहे. सिनेमॅटिक प्रतिमेच्या पलीकडे जाऊन लोकशाहीच्या वास्तववादी कसोटीवर उतरण्याची ही प्रक्रिया राज्याच्या भविष्यातील राजकारणाची नवी दिशा निश्चित करणारी ठरेल यात शंका नाही.**

दाक्षिणात्य राजकारण आणि चित्रपटसृष्टी यांचे नाते हे केवळ व्यवसायापुरते मर्यादित नसून ते समाजमनाचा आरसा राहिले आहे. तमिळ भूमीने चित्रपटगृहातील अंधारात पाहिलेल्या स्वप्नांना मतपेटीतून प्रत्यक्ष उतरवण्याचे कसब गेली अनेक दशके जोपासले आहे. सी एन अण्णादुराई यांनी पेरलेले हे बीज एम जी रामचंद्रन यांनी एका वटवृक्षात रूपांतरित केले आणि त्यानंतर जयललिता यांनी त्याला एका वेगळ्या ग्लॅमरस उंचीवर नेऊन ठेवले. या पार्श्वभूमीवर अभिनेता विजय ज्याला त्याचे चाहते थलपती म्हणजेच सेनापती मानतात त्याचा मुख्यमंत्रिपदाचा शपथविधी हा त्याच परंपरेचा पुढील अंक वाटू शकतो. परंतु हा केवळ पूर्वार्धाचा उत्तरार्ध नाही तर तो तमिळ राजकारणातील एका महत्त्वाच्या स्थित्यंतराचा दस्तऐवज आहे. तमिळनाडूच्या राजकारणाने गेल्या काही वर्षांत एक मोठी पोकळी अनुभवली आहे. एम करुणानिधी आणि जयललिता यांसारख्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वांच्या अस्तानंतर राज्याचे राजकारण द्रमुक आणि अद्रमुक या दोन पारंपरिक ध्रुवांभोवतीच फिरत राहिले. एम के स्टॅलिन यांनी प्रशासनावर पकड मिळवली असली तरी अद्रमुकमधील अंतर्गत यादवीमुळे तिथे एका प्रभावी विरोधी पक्षाची जागा रिकामी होती. कमल हसन आणि रजनीकांत यांसारख्या दिग्गज नटांनी या मैदानात उतरण्याचा प्रयत्न केला खरा पण रजनीकांत यांनी ऐनवेळी घेतलेली माघार आणि कमल हसन यांच्या राजकारणातील बौद्धिक मर्यादा स्पष्ट झाल्यामुळे मतदारांना एका नव्या पर्यायाची प्रतीक्षा होती. विजयने नेमकी हीच नस ओळखली आणि तमिळगा वेत्री कळघम या पक्षाची बांधणी अत्यंत नियोजनबद्ध रीतीने केली. विजयचा विजय हा केवळ त्याच्या सिनेमांतील संवादफेकीवर आधारलेला नाही. त्यामागे दाक्षिणात्य राजकारणातील एक अपरिहार्य वास्तव आहे आणि ते म्हणजे फॅन क्लब्सचे रूपांतर राजकीय केडरमध्ये करणे. विजयने गेली अनेक वर्षे आपल्या चाहत्यांच्या माध्यमातून सामाजिक कार्य करत एक समांतर यंत्रणा उभी केली होती. मात्र पडद्यावर एका फटक्यात दहा जणांना उडवणारा नायक जेव्हा मंत्रालयाच्या खुर्चीत बसतो तेव्हा त्याला कायद्याच्या आणि प्रशासनाच्या चौकटीत राहून काम करावे लागते. विजयाची विचारधारा नेमकी काय आहे हा प्रश्न अद्यापही पूर्णपणे स्पष्ट झालेला नाही. त्याने तमिळ अस्मितेचा मुद्दा उचलला आहे जो त्या भूमीत नेहमीच भावूक प्रतिसाद मिळवतो. पण केवळ अस्मितेच्या जोरावर राज्य चालवता येत नाही. आज तमिळनाडू समोर बेरोजगारी आणि वाढते कर्ज तसेच शेतीचे प्रश्न आ वासून उभे आहेत. द्रविडी मॉडेल हे नेहमीच समाजकल्याणकारी योजनांसाठी ओळखले जाते. फुकटच्या वस्तू वाटण्याचे हे राजकारण एका मर्यादेनंतर राज्याच्या तिजोरीवर मोठा भार टाकते. विजय या जुन्याच वाटेने जाणार की विकासाची एखादी नवी मांडणी करणार यावर त्याच्या यशाचे गमक अवलंबून असेल. विजय समोर सर्वात मोठे आव्हान हे प्रशासकीय अनुभवाचे आहे. त्याच्या मंत्रिमंडळात नवीन चेहरे असणे ही एकीकडे जमेची बाजू असली तरी नोकरशाहीवर वचक बसवणे आणि केंद्र सरकारशी असलेल्या संबंधांचा समतोल राखणे ही मुत्सद्देगिरीची कसोटी असेल. एम जी रामचंद्रन असोत वा जयललिता त्यांनी आपल्या कामातून स्वतःची एक वेगळी ओळख आणि दरारा निर्माण केला होता. विजयचा शपथविधी हा भारतीय लोकशाहीतील व्यक्तीपूजा या मानसिकतेचा पुन्हा एकदा झालेला विजय आहे. जेव्हा प्रस्थापित राजकीय पक्ष लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरतात तेव्हा लोक एका तारणहाराच्या शोधात असतात. पडद्यावरचा नायक हाच आपला उद्धारकर्ता आहे अशी भावना त्यातूनच जन्माला येते. पण ही मानसिकता लोकशाहीच्या प्रगल्भतेसाठी किती आश्वासक आहे हा खरोखरच चिंतेचा विषय ठरू शकतो. आज ज्या टाळ्या आणि शिट्ट्यांच्या गजरात विजयने मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली त्याच जनतेचा रोष ओढवून घ्यायला फार वेळ लागत नाही. पडद्यावरचा थलपती आता खऱ्या आयुष्यात मुख्यमंत्री म्हणून किती जबाबदारीने वागतो हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. सध्यातरी तमिळ भूमीच्या या नव्या प्रयोगाकडे अवघ्या देशाचे लक्ष लागून राहणे अपरिहार्य आहे. विजयच्या या प्रवासातील सर्वात कठीण टप्पा आता सुरू झाला आहे कारण आता प्रेक्षक नाहीत तर मतदार त्याचे परीक्षण करणार आहेत.

# तेलाची धार आणि धोरणाचे म्यान




जागतिक भूराजकारणाचा पट सध्या अत्यंत गुंतागुंतीच्या वळणावर आहे आणि या पटावर खनिज तेलाची किंमत केवळ डॉलरमध्ये मोजली जात नाही. ती संबंधित देशाच्या सार्वभौमत्वाचे आणि आर्थिक क्षमतेचे मोजमाप असते. रशिया आणि युक्रेन यांच्यातील प्रदीर्घ संघर्ष असो वा पश्चिम आशियातील तणावाच्या गडद छटा असोत, त्याचे थेट पडसाद भारतासारख्या विकसनशील देशाच्या अर्थव्यवस्थेवर उमटतात. आपण आपली जवळपास पंच्याऐंशी टक्के उर्जेची गरज आयातीद्वारे पूर्ण करतो आणि हे अवलंबित्व म्हणजे एका अर्थाने आपल्या आर्थिक नाड्या परकीयांच्या हाती सोपवण्यासारखे आहे. अशा वेळी देशांतर्गत तेल उत्खनन आणि उत्पादन वाढवण्याबाबत जी तत्परता दिसायला हवी होती ती दुर्दैवाने सरकारी फाईल्सच्या ढिगाऱ्यात दबलेली दिसते. हे केवळ प्रशासकीय अपयश नसून ते धोरणात्मक अंधत्वाचे लक्षण आहे.

भारताकडे तेलाचे साठे नाहीत असे ओरडण्यात काहीच अर्थ नाही कारण कच्छचे आखात किंवा बंगालच्या उपसागरातील खोल पाण्याचे साठे तिथे उर्जेचा मोठा खजिना दडलेला असल्याचे अनेक भूगर्भीय अहवाल वारंवार ओरडून सांगत असतात. मात्र अडचण निसर्गाच्या दातृत्वाची नसून ती मानवनिर्मित धोरणांची आणि लाल फितीच्या कारभाराची आहे. गेल्या काही दशकांत आपल्या देशांतर्गत तेल उत्पादनात झालेली घट ही अत्यंत चिंताजनक बाब असून ती सरकारच्या आत्मनिर्भर घोषणेच्या पूर्णपणे विरोधात जाणारी आहे. जुन्या विहिरींमधून निघणारे तेल नैसर्गिकरित्या कमी होत असताना नव्या क्षेत्रांचा शोध घेण्यात आपण कमालीची दिरंगाई केली आहे. जागतिक स्तरावर खनिज तेलाच्या किमती जेव्हा शंभर डॉलर्सच्या पलीकडे जातात तेव्हा आपल्या परकीय चलन साठ्यावर जो प्रचंड ताण येतो त्याचे चटके शेवटी सामान्य माणसाच्या खिशालाच बसतात.

तेल उत्खनन हे काही साधे काम नाही आणि त्यासाठी केवळ घोषणा करून चालत नाही. त्यासाठी प्रचंड भांडवल आणि अद्ययावत तंत्रज्ञानाची जोड आवश्यक असते. जगातील मोठ्या तेल कंपन्या भारतात गुंतवणूक करण्यास कशामुळे कचरतात याचा विचार करण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे. एकीकडे आपण हरित उर्जेचा आणि कार्बन उत्सर्जनाच्या शून्य लक्ष्याचा मोठ्या अभिमानाने पाठपुरावा करत आहोत. ही बाब पर्यावरणाच्या दृष्टीने स्वागतार्ह असली तरीही वास्तवाचे भान सोडणे धोक्याचे ठरेल. येत्या काही दशकांपर्यंत खनिज तेलाची गरज पूर्णपणे संपणार नाही हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ सत्य आहे. इलेक्ट्रिक वाहनांची संख्या वाढत असली तरी अवजड उद्योग आणि विमान वाहतूक क्षेत्रासाठी आपल्याला तेलावरच अवलंबून राहावे लागणार आहे.

सरकारी मालकीच्या तेल कंपन्यांची कार्यक्षमता वाढवणे हा यातील दुसरा महत्त्वाचा टप्पा आहे. ओएनजीसी सारख्या बलाढ्य संस्थांकडे प्रचंड क्षमता आहे परंतु त्यांना निर्णयाचे स्वातंत्र्य किती दिले जाते हा कळीचा मुद्दा आहे. नोकरशाहीच्या विळख्यातून या संस्थांना बाहेर काढून त्यांना जागतिक स्पर्धेत उतरवणे ही काळाची गरज आहे. आजच्या जगात ऊर्जा सुरक्षा हीच खरी राष्ट्रीय सुरक्षा आहे असे मानले जाते. ज्या देशाकडे उर्जेचे स्वतःचे स्रोत नाहीत त्याला

> » उर्जेच्या स्वयंपूर्णतेचे ढोल वाजवणे सोपे असले तरी वास्तवाचा रेटा मोठा आहे. जागतिक अशांततेच्या काळात आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी खनिज तेलाच्या उत्खननातील सरकारी सुस्ती झटकून टाकणे हे आता केवळ गरज नसून राष्ट्रीय कर्तव्य ठरते.

जागतिक व्यासपीठावर आपली भूमिका मांडताना अनेक मर्यादा येतात. आपण जर खनिज तेलाच्या आयातीवर इतके अतोनात अवलंबून राहिलो तर आपली अर्थव्यवस्था नेहमीच आंतरराष्ट्रीय बाजारातील चढउतारांच्या ओलीस राहील. उत्पादन क्षेत्राला गती द्यायची असेल आणि मेक इन इंडिया यशस्वी करायचे असेल तर इंधनाचे दर स्थिर असणे ही पहिली अट आहे. हे दर तेव्हाच स्थिर राहू शकतात जेव्हा आपण स्वतःच्या भूमीत तेल शोधण्याचे धाडस आणि वेग दाखवू.

धोरणात्मक अगतिकता सोडून कृती प्रवण होण्याची हीच योग्य वेळ आहे. केवळ बैठका आणि चर्चांचे गुऱ्हाळ सुरू ठेवून ऊर्जा संकट सुटणार नाही. उत्खननाच्या प्रकल्पांना युद्धपातळीवर मंजुरी देऊन प्रत्यक्षात उत्पादन सुरू करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखणे गरजेचे आहे. जर आपण आज नव्या विहिरी खोदण्याबाबत गांभीर्याने विचार केला नाही तर भविष्यात तेलाच्या वाढत्या किमती आपल्या विकासाची गती पूर्णपणे रोखून धरतील. पडद्यामागचे हे काळे वास्तव आता प्रकाशात आले असून त्यावर तातडीने उपाय शोधणे हे केवळ तांत्रिक काम नसून ते एक सर्वोच्च राजकीय कर्तव्य आहे. आपण हे विसरता कामा नये की जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी केवळ भव्य स्वप्ने पुरेशी नसतात तर त्यासाठी इंधनाची रसदही तितकीच भक्कम असावी लागते. अन्यथा स्वप्नांचे इमले कोसळायला वेळ लागणार नाही.

# बहुउद्देशीय विरंगुळा केंद्राचे भूमिपूजन

## सर्व वयोगटातील नागरिकांसाठीचे व्यासपीठ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरातील उद्याने ही शहराचा श्वास असून त्यांचे संवर्धन आणि संगोपन करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. उद्यानांमध्ये उभारण्यात येणाऱ्या विरंगुळा केंद्राच्या माध्यमातून सर्व वयोगटातील नागरिकांना व्यायाम, सांस्कृतिक उपक्रम आणि सामाजिक संवादासाठी उत्तम व्यासपीठ उपलब्ध होणार आहे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मोरवाडी येथील देऊबाई कापसे उद्यान परिसरात बहुउद्देशीय दोन मजली विरंगुळा केंद्राच्या कामाचे भूमिपूजन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसदस्य कुशाग्र कदम, तुषार हिंगे, अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, उपायुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महापौर रवि लांडगे म्हणाले की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरातील उद्यानांचे आधुनिकीकरण आणि नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला जात आहे. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा मिळून त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

देऊबाई कापसे उद्यानात उभारण्यात येणारे हे दोन मजली विरंगुळा केंद्र १८ मीटर बाय ८ मीटर अशा एकूण २८८ चौरस मीटर क्षेत्रात उभारण्यात येणार आहे. या कामासाठी सुमारे ६ लाख ५३ हजार रुपयांचा खर्च अपेक्षित असून काम पूर्ण करण्यासाठी ८ महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

# विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी गणवेश द्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** महापालिका शाळांतील गोरगरीब विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी गणवेश उपलब्ध व्हावा, यासाठी गणवेश खरेदी प्रक्रिया तातडीने सुरू करण्यात यावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे.

महापालिकेच्या बालवाड्यांसह प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी शालेय व पीटी गणवेश, स्वेटर, सॉक्स, रेनकोट, दप्तर, वेस्टकोट, हातरुमाल, हेअर बॅण्ड, रिबीन, टाय आदी साहित्य सोलापूर येथील 'श्री जगदंबा महिला रेडिमेड ड्रेसेस विविध उत्पादन सहकारी औद्योगिक संस्था मर्यादित' या संस्थेकडून खरेदी करण्याचा ठराव शिक्षण समितीने २ एप्रिल रोजी मंजूर केला होता. त्यानंतर स्थायी समितीने २२ एप्रिल रोजी या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे साहित्य मिळणार असून संबंधित संस्था अंध व दिव्यांगांसाठी कार्यरत आहे.

स्थायी समितीच्या ठरावात राष्ट्रवादी काँग्रेसचे संदीप वाघेरे आणि विकास साने यांची सूचक व अनुमोदक म्हणून नावे नोंदवण्यात आली होती. मात्र, आम्ही प्रस्तावाला संमती दिलेली नसून असा कोणताही ठराव सुचवलेला नाही, असे पत्र दोन्ही सदस्यांनी आयुक्तांना दिले. त्यानंतर नगर सचिव विभागाने दुरुस्ती करत सूचक म्हणून बाबासाहेब त्रिभुवन आणि अनुमोदक म्हणून शालिनी गुजर यांची नावे नोंदवली आहेत.

# नगर सचिवपदी उल्हास जगताप?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नगर सचिव पदासाठी सेवानिवृत्त अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांची नियुक्ती होण्याची दाट शक्यता आहे. या संदर्भातील विषय १५ मे रोजी होणाऱ्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेवर ठेवण्यात आला आहे.

महापालिकेच्या सभा शाखेचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी नगर सचिव पद कंत्राटी पद्धतीने भरण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्यानुसार आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित पदासाठी वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध केली होती. या जाहिरातीला प्रतिसाद देत ३० एप्रिलपर्यंत मुदतीत केवळ उल्हास जगताप यांचाच अर्ज प्राप्त झाला. मुदतीनंतर आलेला अर्ज प्रशासनाकडून बाद करण्यात आला आहे. त्यामुळे वैध ठरलेल्या एकमेव अर्जदार म्हणून उल्हास जगताप यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा झाल्याचे मानले जात आहे.

एकाच उमेदवाराचा अर्ज प्राप्त झाल्याने प्रशासन निवड प्रक्रिया पूर्ण करणार की पुन्हा नव्याने अर्ज मागविणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली होती. मात्र, विधी समितीने उल्हास जगताप यांची एका वर्षासाठी मानधन तत्त्वावर कंत्राटी नगर सचिव म्हणून नियुक्ती करण्याचा ठराव मंजूर करून तो सर्वसाधारण सभेकडे शिफारस केला आहे. येत्या शुक्रवारी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत या विषयावर अंतिम निर्णय होण्याची शक्यता असून, उल्हास जगताप यांच्या नियुक्तीवर शिक्कामोर्तब होण्याची चिन्हे आहेत.

# अथर्व चव्हाणची गुगल समर ऑफ कोडसाठी निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगाधारित अनुभव मिळावा, जागतिक तंत्रज्ञान समुदायात योगदान देण्याची संधी उपलब्ध व्हावी आणि सॉफ्टवेअर अभियांत्रिकी क्षेत्रात व्यावहारिक कौशल्य विकसित करता यावे यासाठी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या विश्वस्त मंडळाच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड विद्यापीठात विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमांच्या माध्यमातूनच पीसीयूचा विद्यार्थी अथर्व चव्हाण याची 'गुगल समर ऑफ कोड २०२६' या प्रतिष्ठित कार्यक्रमासाठी निवड झाली असून हा विद्यापीठासाठी अभिमानाचा क्षण असल्याचे प्रतिपादन पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी केले.

पिंपरी चिंचवड विद्यापीठाच्या कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थी अथर्व चव्हाण याची 'गुगल समर ऑफ कोड २०२६' या जागतिक स्तरावरील प्रतिष्ठित कार्यक्रमासाठी निवड झाली आहे. या उपक्रमाद्वारे प्रतिभावान विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय ओपन सोर्स प्रकल्पांमध्ये योगदान देण्याची संधी दिली जाते. अथर्व चव्हाण हा २५ मे ते २४ ऑगस्ट २०२६ या कालावधीत 'गुगल समर ऑफ कोड' कॉन्ट्रिब्यूटर म्हणून जागतिक तज्ज्ञ मार्गदर्शकांसोबत 'चेकस्टाईल' या ओपन सोर्स प्रकल्पावर काम करणार आहे.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, व्यवस्थापन प्रतिनिधी नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, पीसीयूचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, कुलसचिव डॉ. अनिल महेश्वरी, पीसीईटी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी अथर्व चव्हाण याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पीसीएमसीच्या डीएमएस कारभारावर प्रश्नचिन्ह

# १९२ कोटींची 'पेपरलेस' प्रणाली ठप्पच...

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेने डॉक्युमेंट मॅनेजमेंट सिस्टम (डीएमएस) या ई-ऑफिस प्रणालीवर तब्बल ११२ कोटी रुपये खर्च करूनही कामकाज वारंवार ठप्प होत असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पेपरलेस कारभाराचा दावा करणारी ही प्रणाली प्रत्यक्षात संथ गतीने चालत असून अधिकारी व कर्मचारी वैतागले आहेत.

महापालिकेत १ एप्रिल २०२५ पासून डीएमएस प्रणालीद्वारे कामकाज सुरू करण्यात आले. पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड कंपनीमार्फत जीआयएस सक्षम ईआरपी प्रकल्प विकसित करण्यात आला असून, त्याअंतर्गत महापालिकेच्या ३५ विभागांचे दैनंदिन कामकाज ई-ऑफिस प्रणालीवर सुरू झाले. अधिकारी, कर्मचारी, विभागप्रमुख आणि शाखाप्रमुखांना डिजिटल कोड देण्यात आले असून १ हजार ७०९ डिजिटल स्वाक्षरी की तयार करण्यात आल्या आहेत.

मात्र, गेल्या वर्षभरात या प्रणालीमध्ये सातत्याने तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. मागील काही दिवसांपासून पाचपैकी तीन सर्व्हर बंद असल्याने दररोज दुपारनंतर प्रणाली डाऊन होत असल्याची तक्रार आहे. कागदपत्रांचे स्कॅनिंग, ट्रॅकिंग, सामायिकरण आणि शोध प्रक्रियेला मोठा विलंब लागत असून, एक मिनिटाचे काम पूर्ण करण्यासाठी अख्खा दिवस खर्च होत असल्याचा संताप अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे. सुमारे १२ कोटी रुपयांचा असलेला हा प्रकल्प विविध कारणांमुळे वाढत जाऊन ११२ कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचा आरोप होत आहे. प्रशासकीय राजवट संपल्यानंतरही खर्चाचा सिलसिला कायम असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

पेपरलेस कारभाराचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात कागदांचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरूच आहे. प्रस्ताव सादर करण्यासाठी आणि सह्या घेण्यासाठी फाईलींचे गठ्ठे तयार केले जात असून, पदाधिकारी आणि नगरसेवकांना माहिती देण्यासाठीही कागदपत्रांचा वापर होत आहे. अधिकाऱ्यांच्या टेबलवरील फाईलींचे ढीगही कायम असल्याचे चित्र आहे.

या प्रकल्पातील संगणक प्रणालीची देखभाल आणि दुरुस्तीचे काम 'टेक नाईन सर्व्हिसेस' या कंपनीकडे असून, त्यासाठी अतिरिक्त ३३ लाख २७ हजार रुपयांचा खर्च करण्यास स्थायी समितीने नुकतीच मंजुरी दिली आहे. स्मार्ट सिटी कंपनीमार्फत प्रणाली सुरू करण्यात आल्याने महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून जबाबदारी झटकली जात असल्याचा आरोपही होत आहे. तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून दुरुस्ती केली जात असली, तरी याबाबत माहिती देण्यास टाळाटाळ होत असल्याचे बोलले जात आहे. सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी या संपूर्ण प्रकल्पाच्या चौकशीची मागणी केली आहे. "१२ कोटींचा प्रकल्प ११२ कोटींवर कसा गेला? ठराविक ठेकेदाराला डोळ्यासमोर ठेवून प्रक्रिया राबविण्यात आली. इतका खर्च करूनही प्रणाली वारंवार बंद पडत आहे. त्यामुळे संबंधित अधिकारी, ठेकेदार आणि सल्लागारांकडून खर्च वसूल करून दोषींवर कारवाई करावी," अशी मागणी त्यांनी केली आहे.

# पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पीसीएमसीची कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** शहरातील तापमानाचा पारा चाळीशीच्या उंबरठ्यावर पोहोचल्याने पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शहरासह उपनगरांमध्ये अपुरा आणि विस्कळीत पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी वाढत असतानाच पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने नळाला थेट विद्युत मोटारपंप लावून पाणी खेचणाऱ्यांविरोधात कारवाई सुरू केली आहे.

या मोहिमेत पिंपळे निलख परिसरातून १४, तर थेरगावमधील पवारनगर आणि पडवळनगर परिसरातून ९ असे एकूण २३ विद्युत मोटारपंप जप्त करण्यात आले आहेत. सध्या चिखली, मोशी, चऱ्होली, दिघी, भोसरी, डुडुळगाव, थेरगाव, दापोडी, सांगवी, पिंपळे गुरव, काळेवाडी, प्राधिकरण, किवळे आणि वाल्हेकरवाडी आदी भागांत पाणीपुरवठा विस्कळीत होत असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर येत आहेत. अपुरा आणि अवेळी पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

महापालिकेने नागरिकांना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले आहे. गाड्या धुणे, अंगण आणि रस्त्यावर पिण्याचे पाणी मारणे, जिने धुणे तसेच बागा आणि झाडांना मोठ्या प्रमाणावर पाणी घालणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून वारंवार करण्यात येत आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### गळफास घेऊन महिलेची आत्महत्या

**चाकण :** चाकण उत्तर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील महात्मा फुलेनगर परिसरात ३० वर्षीय महिलेने राहत्या घरात पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. चंद्रभागा अविनाश जगताप (वय ३०, रा. महात्मा फुलेनगर, चाकण, ता. खेड) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. चाकण उत्तर पोलीस अधिक तपास करत आहेत.

### वाकीमधून तडीपार आरोपी ताब्यात

**चाकण :** संपूर्ण पुणे जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले असतानाही आदेशाचे उल्लंघन करून जिल्ह्यात वावरत असल्याप्रकरणी कुणाल बाळू वीर (वय २४, रा. सुंबरेनगर, वाकी, ता. खेड) याच्याविरुद्ध चाकण उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित आरोपीने तडीपार आदेश रद्द करून घेतला नव्हता किंवा जिल्ह्यात येण्यासाठी परवानगी घेतली नव्हती.

### चाकणमध्ये तडीपार आरोपी जेरबंद

**चाकण:** संपूर्ण पुणे जिल्ह्यातून १८ महिन्यांसाठी तडीपार करण्यात आलेले असतानाही आदेशाचे उल्लंघन करून हद्दीत आलेल्या मयूर सुनील मेटे (वय ३२, रा. चाकण, ता. खेड, जि. पुणे) याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम १४२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शेतकऱ्याच्या गाडीतून २ लाख लांबवले

**लोणी काळभोर:** फुलशेती करणाऱ्या शेतकऱ्याच्या गाडीतून तब्बल दोन लाख रुपयांहून अधिक रोकड चोरीला गेल्याची घटना घडली. याप्रकरणी शहाजी ढवळे (वय ४०, व्यवसाय – शेती, रा. नायगाव, ता. हवेली) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते सहा रस्त्यांचा शुभारंभ

# ट्रॅफिकमुक्त चाकणसाठी कामांचे भूमिपूजन

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**राजगुरुनगर :** पुणे-नाशिक महामार्गावरील चाकण औद्योगिक क्षेत्रात वाढत्या वाहतूक कोंडीच्या समस्येवर उपाय म्हणून पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण अंतर्गत विविध पायाभूत सुविधा विकासकामांना गती देण्यात आली आहे. चऱ्होली, केळगाव, कुरुळी, निघोजे, मोई आणि खालुंब्रे गावांतील सहा महत्त्वाच्या रस्त्यांच्या सुधारणा व विकासकामांचे भूमिपूजन आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते शनिवारी (दि. ९) करण्यात आले.

या अंतर्गत चऱ्होली ते आळंदी-मरकळ रस्ता सुधारणा, आळंदी फाटा ते आळंदी रस्ता विकास, कुरुळी फाटा ते निघोजे रस्ता सुधारणा, चिखली ते मोई रस्ता सुधारणा, निघोजे ते चाकण एमआयडीसी रस्ता विकास तसेच खालुंब्रे ते चाकण एमआयडीसी टप्पा क्रमांक २ रस्ता सुधारणा ही कामे हाती घेण्यात आली आहेत. आमदार बाबाजी काळे यांच्या पाठपुराव्यामुळे या सर्व कामांसाठी तब्बल ७६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

चाकण आणि परिसरातील गावांमध्ये दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक त्रस्त झाले होते. ट्रॅफिकमुक्त चाकण कृती समितीच्या वतीने अनेकदा रास्ता रोको आंदोलने करण्यात आली होती. त्यानंतर या रस्ते विकासकामांना गती मिळाली आहे. या कार्यक्रमाला पीएमआरडीएचे सदस्य वसंत भसे, जिल्हा परिषद सदस्य ॲड. विजयसिंह शिंदे पाटील, पंचायत समिती सभापती विद्या मोहिते, उपसभापती मंगेश सावंत, बाजार समिती संचालक सागर मुऱ्हे, सोमनाथ मुंगसे, पंचायत समिती सदस्य गौरी मुऱ्हे, रूपाली कांबळे, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास धनवटे, जीवन खराबी, चंदन मुऱ्हे, निघोजे सरपंच सुनीत येळवंडे, कुरुळी सरपंच शिवगंगा सोनवणे, मोई सरपंच शिलाताई रोकडे यांच्यासह आजी-माजी सरपंच, उपसरपंच, विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांचे पदाधिकारी, ग्रामस्थ आणि शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जुन्नर तालुक्याला पूर्णवेळ तहसीलदार नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**आळेफाटा :** तत्कालीन तहसीलदार डॉ. सुनील शेळके यांची बदली झाल्यापासून जुन्नर तहसील कार्यालयाचे तहसीलदार पद रिक्त आहे. सध्या या पदाचा अतिरिक्त कार्यभार बाळासाहेब शीरसाठ यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.

डॉ. सुनील शेळके यांच्या कार्यकाळात ई-फेरफार, ई-हक्क, ॲग्रीस्टॅक, पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त करणे आदी शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनांची जुन्नर तालुक्यात प्रभावी अंमलबजावणी झाली होती. त्यांच्या कामाची दखल घेत पुणे जिल्ह्यातील उत्कृष्ट तहसीलदार म्हणून त्यांचा गौरवही करण्यात आला होता. मात्र, त्यांच्या बदलीनंतर गेल्या काही काळापासून जुन्नरला पूर्णवेळ तहसीलदारच नाही. अतिरिक्त कार्यभारामुळे दैनंदिन कामकाजावर परिणाम होत असून नागरिकांना दाखले, ७/१२ उतारे, फेरफार नोंदी, संजय गांधी निराधार योजना तसेच शेतकरीविषयक कामांसाठी खोळंबा सहन करावा लागत आहे. त्याचबरोबर नायब तहसीलदार पदेदेखील रिक्त असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.

जुन्नर हा भौगोलिकदृष्ट्या पुणे जिल्ह्यातील सर्वात मोठा तालुका असून येथे आदिवासी व डोंगरी भाग मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे तालुक्यासाठी पूर्णवेळ तहसीलदार असणे अत्यंत आवश्यक असल्याची मागणी नागरिक व शेतकऱ्यांकडून होत आहे. रिक्त पदे तातडीने भरून प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# फ्लॉवरच्या बाजारभावात घसरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात मोठ्या प्रमाणावर घेतल्या जाणाऱ्या फ्लॉवर पिकाला सध्या कमी बाजारभाव मिळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. उत्पादन खर्च वाढत असताना बाजारात मात्र फ्लॉवरला अपेक्षित दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सध्या बाजारात दहा किलो फ्लॉवरला अवघा ८० ते ९० रुपये दर मिळत आहे. त्यामुळे काढणी मजुरी, औषध फवारणी, खतांचा खर्च, पाणीपुरवठा तसेच वाहतूक खर्च वजा जाता शेतकऱ्यांच्या हातात फारसे काहीच राहत नसल्याची परिस्थिती आहे. अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने फ्लॉवरची लागवड केली होती; मात्र बाजारभाव कोसळल्याने गुंतवलेले भांडवलही परत मिळणार की नाही, अशी चिंता त्यांना सतावत आहे.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील पारगाव, शिंगवे, रांजणी, वळती, नागापूर, थोरांदळे आदी गावांमध्ये फ्लॉवरची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यात आली आहे. या परिसरातून मंचर बाजारपेठ जवळ असल्याने वाहतुकीचा खर्च तुलनेने कमी येतो. मात्र बाजारात आवक वाढल्याने दर घसरले असून त्याचा फटका थेट शेतकऱ्यांना बसत आहे.

नागापूर येथील शेतकरी सोमनाथ मिंडे यांनी यंदा फ्लॉवरचे पीक घेतले आहे. मात्र सध्याच्या बाजारभावामुळे उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले असल्याचे त्यांनी सांगितले. “औषधे, मजुरी आणि खतांचे दर सातत्याने वाढत आहेत. त्यामानाने बाजारात दर मिळत नसल्याने मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे,” अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. बाजारभावात लवकर सुधारणा झाली नाही, तर अनेक शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# सामुदायिक विवाह सोहळा ही काळाची गरज

### ॲड. विजयसिंह (दादा) शिंदे पाटील यांचे प्रतिपादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**राजगुरुनगर :** “लग्नसमारंभातील वाढता अनावश्यक खर्च आणि अवडंबर टाळून सामान्यांना दिलासा देण्यासाठी सामुदायिक विवाह सोहळा ही आजच्या काळाची गरज आहे,” असे प्रतिपादन पुणे जिल्हा परिषद गटनेते ॲड. विजयसिंह (दादा) शिंदे पाटील यांनी केले. खेड तालुक्यातील दुर्गम भाग असलेल्या डेहणे येथे आयोजित सामुदायिक विवाह सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी विजयदादांनी आदिवासी बांधवांच्या आग्रहाखातर त्यांच्या पारंपरिक वाद्यांच्या तालावर नृत्याचा ठेका धरत उपस्थितांची मने जिंकली. दरवर्षीप्रमाणे यंदाही डेहणे येथे अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. नवदाम्पत्यांना आशीर्वाद देण्यासाठी ॲड. विजयसिंह शिंदे पाटील यांनी विशेष उपस्थिती लावली.

आपल्या भाषणात ते म्हणाले, “आदिवासी संस्कृती ही निसर्गाशी नाळ जोडणारी समृद्ध संस्कृती आहे. क्रांतीसूर्य बिरसा मुंडा यांच्या विचारांनी प्रेरित होणारे हे विवाह सोहळे केवळ लग्न नसून सामाजिक एकतेचे प्रतीक आहेत. आर्थिक ओझ्याखाली दबलेल्या कुटुंबांना असे सोहळे मोठे बळ देतात. अशा उपक्रमांमुळे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत प्रगतीची दारे उघडतील.”

कार्यक्रमादरम्यान आदिवासी बांधवांनी पारंपरिक नृत्य सादर केले. यावेळी कार्यकर्ते आणि आदिवासी बांधवांच्या आग्रहास्तव विजयदादा शिंदे पाटील यांनीही नृत्यात सहभाग घेतला. लोकप्रतिनिधीला आपल्या संस्कृतीत रंगून सहभागी होताना पाहून आदिवासी बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी आदिवासी भागातील पायाभूत सुविधा, शिक्षण आणि आरोग्यविषयक प्रश्नांवर चर्चा करताना विजयदादांनी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून या भागाच्या शाश्वत विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन दिले. या सोहळ्यास तालुक्यातील विविध मान्यवर, पदाधिकारी आणि आदिवासी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित पाहुण्यांच्या वतीने आयोजकांचे आभारही शिंदे पाटील यांनी मानले.

# ऊसतोड कामगाराच्या मुलीचे परीक्षेत यश



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या बळावर यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांची उदाहरणे अनेकांसाठी प्रेरणादायी ठरतात. अशीच प्रेरणादायी कामगिरी आंबेगाव तालुक्यातील पारगाव येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखाना परिसरात राहणाऱ्या दीपाली गोरक्ष बुधवंत हिने केली आहे. दहावीच्या परीक्षेत तिने ८०.२० टक्के गुण मिळवत विद्यालयात तृतीय क्रमांक पटकावला आहे.

दीपालीचे वडील गोरक्ष बुधवंत हे मूळचे पाथर्डी, ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून, गेल्या अनेक वर्षांपासून ऊसतोड कामासाठी पारगाव येथील भीमाशंकर कारखाना परिसरात झोपडी बांधून वास्तव्यास आहेत. अत्यंत साध्या आणि प्रतिकूल परिस्थितीत राहून त्यांनी आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह केला आहे.

दीपालीनेही आपल्या आई-वडिलांसोबत ऊसतोडणीच्या कामात हातभार लावत शिक्षणाची वाट सोडली नाही. कामाच्या व्यापातून मिळालेल्या अत्यल्प वेळेत अभ्यास करून तिने हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे परिसरात तिचे कौतुक होत असून अनेक विद्यार्थ्यांसमोर तिने प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. ही माहिती समजताच पारगावचे माजी उपसरपंच सचिन दत्तात्रय अस्वारे यांनी दीपालीच्या घरी जाऊन तिचे अभिनंदन केले. तसेच तिच्या पुढील शिक्षणासाठी आवश्यक ती सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष गोरक्ष ढोबळे, स्वप्नील कुल्लाळ, गोरक्ष बुधवंत व त्यांच्या कुटुंबीयांसह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

# पैशांच्या लालसेपोटी ज्येष्ठ महिलेचा खून

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** सोन्याचे दागिने आणि पैशांच्या लालसेपोटी एका नातेवाईकाने ८० वर्षीय वृद्ध महिलेचा गळा दाबून खून केल्याची धक्कादायक घटना खेड तालुक्यातील करंजविहीरे येथे उघडकीस आली आहे.

आरोपीने पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह गोणीत भरून भामा नदीच्या पात्रात फेकून दिला होता. सिंधुबाई विठोबा मरगज (वय ८०, रा. करंजविहीरे, ता. खेड, जि. पुणे) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी कैलास कुंडलिक मरगज (वय ३६, रा. करंजविहीरे, ता. खेड, जि. पुणे) याला पोलिसांनी अटक केली आहे. समीर बाळू मरगज (वय २७, रा. करंजविहीरे, ता. खेड, जि. पुणे) यांनी शुक्रवारी उत्तर म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवार दि. २ मे २०२६ रोजी सायंकाळी करंजविहीरे गावातील मरगज वस्ती परिसरात ही घटना घडली. आरोपी कैलास मरगज याने सिंधुबाई मरगज यांच्या अंगावरील सुमारे २५ हजार रुपये किमतीचा सोन्याचा चंद्रहार व मणी जबरदस्तीने हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, सिंधुबाई यांनी प्रतिकार केल्याने आरोपीने त्यांचा गळा दाबून खून केला. यानंतर गुन्हा लपविण्यासाठी आरोपीने मृतदेह प्लास्टिकच्या गोणीत भरून करंजविहीरे ते धामणे रस्त्यावरील भामा नदीच्या पात्रात फेकून दिला. घटनेनंतर ज्येष्ठ महिलेचा शोध सुरू असताना हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. उत्तर म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस पुढील तपास करत आहेत.

# चोरीच्या २४ दुचाक्यांसह दोन सराईत गजाआड

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चाकण :** पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील दक्षिण महाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी आंतरजिल्हा दुचाकी चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत दोन सराईत चोरट्यांना अटक केली आहे. आरोपींकडून तब्बल ३६ लाख रुपये किमतीच्या २४ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

मागील महिन्यात १४ एप्रिल २०२६ रोजी महाळुंगे येथील पानसे ऑटो प्रा. लि. कंपनीच्या पार्किंगमधून स्प्लेंडर मोटारसायकल चोरीला गेली होती. याप्रकरणी संदीपकुमार निसाद यांनी दक्षिण महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

त्यानंतर पोलिसांनी महाळुंगे ते जुन्नर या मार्गावरील तब्बल ८० किलोमीटर परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली. तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींची ओळख पटवून त्यांना ताब्यात घेण्यात आले. यश सुनील हांडे (वय १९, रा. पिंपळगाव सौदा, ता. जुन्नर) आणि किरण संभाजी जाधव (वय २६, रा. टिकेकरवाडी, ता. जुन्नर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिस तपासात आरोपींनी पुणे, नवी मुंबई, मुंबई, ठाणे, नाशिक आणि अहिल्यानगर (अहमदनगर) परिसरातूनही दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली आहे. जप्त करण्यात आलेल्या वाहनांमध्ये रॉयल एनफिल्ड क्लासिक ३५० (बुलेट), यामाहा आर-१५, पल्सर २२० आणि शाईन यांसारख्या महागड्या दुचाकींचा समावेश आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पोलीस उपायुक्त श्वेता खेडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ, पोलीस निरीक्षक अनिल देवडे, सहायक पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली आणि तपास पथकाने केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार चेतन सावंत करत आहेत.

### टोमॅटो, कोबी, मिरची व वांग्याची भरपूर आवक; एकूण उलाढाल ७ कोटी रुपये

# चाकण बाजारपेठेत कांद्याच्या आवकेत मोठी वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये कांदा, टोमॅटो, कोबी, हिरवी मिरची व वांग्याच्या आवकेत वाढ झाली आहे. फळभाज्यांसह पालेभाज्यांचीही मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने बाजारात चांगली उलाढाल झाली असून रविवारी बाजाराची एकूण उलाढाल सुमारे ७ कोटी रुपये झाली.

चाकण बाजारात कांद्याच्या आवकेत मागील आठवड्याच्या तुलनेत वाढ झाली असून कांद्याची एकूण आवक ६ हजार ५०० क्विंटल झाली. कांद्याला प्रतिक्विंटल ६०० ते १ हजार ३०० रुपये दर मिळाला. बटाट्याची एकूण आवक १ हजार ७५० क्विंटल झाली असून बटाट्याचा कमाल भाव १ हजार ३०० रुपये राहिला. लसणाची ५० क्विंटल आवक झाली असून त्याला प्रतिक्विंटल १२ हजार रुपये कमाल भाव मिळाला. हिरव्या मिरचीची ३४० क्विंटल आवक झाली असून तिला ३ हजार ते ५ हजार रुपये दर मिळाला.

कांद्याला भाव क्रमांक १ साठी १ हजार ३०० रुपये, भाव क्रमांक २ साठी १ हजार रुपये आणि भाव क्रमांक ३ साठी ६०० रुपये दर मिळाला. बटाट्याला भाव क्रमांक १ साठी १ हजार ३०० रुपये, भाव क्रमांक २ साठी १ हजार रुपये आणि भाव क्रमांक ३ साठी ८०० रुपये दर मिळाला.

फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये असून प्रति दहा किलोसाठी मिळालेले भाव पुढीलप्रमाणे होते : टोमॅटो २७० क्विंटल (१ हजार ५०० ते २ हजार रुपये), कोबी २३० क्विंटल (४०० ते ६०० रुपये), फ्लॉवर २०५ क्विंटल (८०० ते १ हजार रुपये), वांगी ७६ क्विंटल (१ हजार ५०० ते ३ हजार रुपये), भेंडी ५६ क्विंटल (२ हजार ते ३ हजार रुपये), दोडका ४६ क्विंटल (२ हजार ते ४ हजार रुपये), कारली ५२ क्विंटल (२ हजार ते ३ हजार रुपये), दुधी भोपळा ४६ क्विंटल (५०० ते १ हजार ५०० रुपये), काकडी ९८ क्विंटल (१ हजार ते २ हजार रुपये), फरशी २० क्विंटल (१० हजार ते १५ हजार रुपये), वालवड ४२ क्विंटल (२ हजार ते ४ हजार रुपये), ढोबळी मिरची १४४ क्विंटल (२ हजार ते ४ हजार रुपये), चवळी ३२ क्विंटल (२ हजार ते ४ हजार रुपये), वाटाणा २० क्विंटल (६ हजार ते ८ हजार रुपये), शेवगा ५० क्विंटल (२ हजार ते ३ हजार रुपये), गाजर १६० क्विंटल (१ हजार ५०० ते २ हजार ५०० रुपये), गवार ५२ क्विंटल (२ हजार ते ४ हजार रुपये) आणि आले १४५ क्विंटल (२ हजार ते ५ हजार रुपये) असे दर राहिले.

चाकण बाजारात पालेभाज्यांची आवकही मोठ्या प्रमाणात झाली. मेथीच्या ९ हजार ६५० जुड्यांना १ हजार ५०० ते २ हजार रुपये, कोथिंबीरीच्या १७ हजार ५०० जुड्यांना १ हजार ५०० ते २ हजार ५०० रुपये, शेपूच्या ३ हजार २०० जुड्यांना ७०० ते १ हजार ५०० रुपये, तर पालकाच्या ३ हजार ४०० जुड्यांना ७०० ते १ हजार ५०० रुपये दर मिळाला.

जनावरांच्या बाजारात विक्रीसाठी आलेल्या ५० जर्सी गाईंपैकी ३५ गाईंची विक्री झाली असून त्यांना १५ हजार ते ७० हजार रुपये दर मिळाला. ६० बैलांपैकी ४५ बैलांची विक्री झाली असून त्यांना १० हजार ते ४० हजार रुपये दर मिळाला. ८५ म्हशींपैकी ६८ म्हशींची विक्री झाली असून त्यांना ३० हजार ते ८० हजार रुपये भाव मिळाला. तसेच, ११ हजार ५०० शेळ्या-मेंढ्यांपैकी १० हजार ९०० जनावरांची विक्री झाली असून त्यांना २ हजार ते १५ हजार रुपये दर मिळाला.

## सारांश वृत्त

### पालक्काडमध्येही विजयचा जल्लोष

**पालक्काड (केरळ):** अभिनेते-राजकारणी सी. जोसेफ विजय यांच्या तामिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून झालेल्या शपथविधी सोहळ्यानिमित्त केरळच्या पालक्काड जिल्ह्यात त्यांच्या उत्साही चाहत्यांनी ढोल-ताशांच्या गजरात, नृत्याने, फटाक्यांच्या आतषबाजीने आणि मिठाई वाटून जल्लोष साजरा केला. अनेकांनी 'ऐतिहासिक राजकीय क्षण' असे वर्णन केलेल्या या सोहळ्यानिमित्त, कडक उन्हाची पर्वा न करता, जिल्ह्यातील विविध ठिकाणी मोठ्या संख्येने समर्थक जमले होते.

### अमली पदार्थ तस्करांवर बहिष्कार

**भद्रवाह (डोडा)** : जम्मू आणि काश्मीरच्या भद्रवाह भागातील, प्रामुख्याने गुज्जर आणि बकरवाल या आदिवासी समुदायांनी, अमली पदार्थांचे सेवन किंवा तस्करीमध्ये सहभागी असलेल्या कोणत्याही सदस्यावर सामाजिक बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. लंबरदार मोहम्मद हुसेन चेची यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी गटांनी भद्रवाहच्या केलार वनक्षेत्रातील सौंधर कुरणात एक भव्य 'जिरगा' आयोजित केला, जिथे त्यांनी सुरू असलेल्या "नशा मुक्त जम्मू आणि काश्मीर" मोहिमेचा भाग म्हणून मादक पदार्थांच्या सेवनाविरुद्धचा लढा अधिक तीव्र करण्याची शपथ घेतली.

### तस्करीविरोधात पोलिसांची कारवाई

**भुवनेश्वर** : खोल समुद्रात नांगरलेल्या जहाजांमधून चोरून साहित्य मिळवल्याच्या आरोपाखाली ओडिशा पोलिसांनी सुमारे ३,५०० लिटर डिझेल जप्त केले असून एका व्यक्तीला अटक केली आहे, अशी माहिती एका अधिकाऱ्याने शनिवारी दिली. जगत्सिंहपूर जिल्हा पोलिसांनी एका निवेदनात म्हटले आहे की, ही जप्ती पारादीप सागरी पोलीस क्षेत्राच्या किनारी हद्दीत राबवण्यात आलेल्या एका विशेष अंमलबजावणी मोहिमेचा भाग होती. पोलिसांनी अंदाजे ३,५०० लिटर डिझेलची अवैध वाहतूक करणाऱ्या एका मोटर-चालित बोटीला अडवले. डिझेल, बोट आणि इतर साहित्य घटनास्थळीच जप्त करण्यात आले.

## अभिनेता विजय यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली

# तामिळनाडूमध्ये नवे राजकीय पर्व

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई** : सी. जोसेफ विजय यांनी रविवारी तामिळनाडूच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेत राज्याच्या राजकारणात नव्या पर्वाची सुरुवात केली. चेन्नईतील नेहरू इनडोअर स्टेडियम येथे आयोजित भव्य शपथविधी सोहळ्यात राज्यपाल आर. एन. रवी यांनी विजय आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील सदस्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. विजय यांच्यासह बहुतेक मंत्र्यांनी देवाच्या नावाने शपथ घेतली.

मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर विजय यांनी तत्काळ काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. २०० युनिटपर्यंत मोफत वीजपुरवठा, महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष महिला संरक्षण दलाची स्थापना तसेच प्रत्येक जिल्ह्यात अमली पदार्थविरोधी पथके उभारण्याच्या प्रस्तावांना



त्यांनी मंजुरी दिली. राज्यात स्वच्छ, पारदर्शक आणि लोकाभिमुख प्रशासन देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

प्रशासकीय पातळीवर मोठे फेरबदल करत विजय यांनी आयएएस अधिकारी डॉ. पी. सेंथिलकुमार आणि जी. लक्ष्मी प्रिया यांची मुख्यमंत्र्यांचे मुख्य सचिव म्हणून नियुक्ती केली. राज्याच्या आर्थिक परिस्थितीबाबत बोलताना त्यांनी तामिळनाडूवर सुमारे १० लाख कोटी रुपयांचे कर्ज असल्याचे सांगितले आणि लवकरच आर्थिक स्थितीवर श्वेतपत्रिका सादर करण्याचे जाहीर केले.

मुख्यमंत्री विजय यांनी आपल्या पहिल्याच भाषणात निवडणुकीतील आश्वासने पूर्ण करण्यासाठी जनतेने काही काळ सहकार्य करावे, असे आवाहन केले. "मी जनतेच्या पैशातील एक पैसाही गैरवापर करणार नाही. मला त्याची गरज नाही आणि माझ्या मंत्रिमंडळालाही चुकीचे वर्तन करू देणार नाही," असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला. राज्यात सत्तेची अनेक केंद्रे निर्माण होणार नाहीत, असे स्पष्ट करत विजय म्हणाले, "या सरकारमध्ये एकच सत्ताकेंद्र असेल आणि ते माझ्या नेतृत्वाखालील असेल." तसेच त्यांनी "खऱ्या धर्मनिरपेक्ष सामाजिक न्यायाच्या नव्या युगाची सुरुवात" होत असल्याचेही नमूद केले.

चित्रपटसृष्टीतील आपल्या प्रवासाचा उल्लेख करत विजय म्हणाले, "मी कोणत्याही राजघराण्यातून आलेलो नाही. मी तुमच्यासारखाच सामान्य माणूस आहे." संकटांच्या काळात पाठिंबा देणाऱ्या जनतेचे त्यांनी आभार मानले आणि पारदर्शक प्रशासन देण्याचा पुनरुच्चार केला. महिलांच्या सुरक्षेबाबत कठोर भूमिका घेत मुख्यमंत्री विजय यांनी राज्यात कायदा व सुव्यवस्था मजबूत ठेवण्याचे आश्वासन दिले. अमली पदार्थांच्या वाढत्या धोक्याविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या मंत्रिमंडळात एन. आनंद, आधव अर्जुन, केजी अरुणराज, केए सेंगोट्टय्यान, पी. वेंकटरामनन, सीटीआर निर्मल कुमार, ए. राजमोहन, टीके प्रभू आणि एस. कीर्थना यांनी मंत्री म्हणून शपथ घेतली.

## पंतप्रधान मोदींकडून विजय यांचे अभिनंदन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी तामिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर सी. जोसेफ विजय यांचे अभिनंदन केले. तसेच, राज्यातील जनतेच्या कल्याणासाठी केंद्र सरकार तामिळनाडू सरकारसोबत समन्वयाने काम करत राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

तामिळगा वेट्री कळघम (टीव्हीके) पक्षाचे विधिमंडळ पक्षनेते असलेले विजय यांनी रविवारी चेन्नई येथे आयोजित समारंभात मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ अर्लेकर यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

'एक्स'वरील पोस्टमध्ये मोदी म्हणाले, "तामिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्याबद्दल थिरू सी. जोसेफ विजय यांचे अभिनंदन. त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी हार्दिक शुभेच्छा. लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी केंद्र सरकार तामिळनाडू सरकारसोबत काम करत राहील."

दरम्यान, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनीही विजय यांचे अभिनंदन करत नवीन सरकार सामाजिक न्याय आणि स्वाभिमानाच्या तत्त्वांवर आधारित प्रशासन देईल, असा विश्वास व्यक्त केला. "तामिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून थिरू टीव्हीके विजय यांच्या शपथविधीनिमित्त मी त्यांना, तामिळगा वेट्री कळघम पक्षाला आणि संपूर्ण पुरोगामी आघाडीला मनःपूर्वक शुभेच्छा देतो," असे खर्गे यांनी 'एक्स'वरील संदेशात म्हटले.

नवीन सरकारची स्थापना ही तामिळनाडूच्या राजकारणातील आत्मसन्मान, सामाजिक न्याय, सक्षमीकरण आणि विवेकबुद्धी या मूल्यांचे सातत्य दर्शवते, असेही त्यांनी नमूद केले. ही तत्त्वे पेरियार ई. व्ही. रामासामी आणि के. कामराज यांच्या वारशातून पुढे आली असल्याचे खर्गे यांनी सांगितले. तामिळनाडूमधील लाखो नागरिकांनी, विशेषतः तरुणांनी, टीव्हीकेवर विश्वास व्यक्त केला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## सोभनदेव चट्टोपाध्याय विरोधी पक्षनेते

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : नुकत्याच झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर तृणमूल काँग्रेस ने शनिवारी सोभनदेव चट्टोपाध्याय यांची विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती केली.

शनिवारी सायंकाळी पक्षाकडून जारी करण्यात आलेल्या निवेदनात आसिमा पात्रा आणि नयना बंडोपाध्याय यांची विरोधी पक्षाच्या उपनेतेपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली. तसेच, फिरहाद हकीम यांची विधानसभेतील मुख्य प्रतोद म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. हकीम



हे कोलकाता महानगरपालिकाचे महापौर म्हणूनही कार्यरत आहेत. पक्षाने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, नवनियुक्त नेते "बंगालच्या जनतेच्या हितासाठी निष्ठेने कार्य करतील."

२९४ सदस्यांच्या पश्चिम बंगाल विधानसभेत भारतीय जनता पक्ष ने २०७ जागा जिंकत दणदणीत विजय मिळवला आणि राज्यात प्रथमच सत्ता स्थापन केली. तर तृणमूल काँग्रेसला ८० जागांवर विजय मिळाला.

## मुख्यमंत्री विजय यांना स्टॅलिन यांचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई** : डीएमके अध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी रविवारी मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय आणि तमिळगा वेट्री कळघम (टीव्हीके) सरकारचे पदभार स्वीकारल्याबद्दल अभिनंदन केले. याचबरोबर आर्थिक अडचणींसाठी मागील सरकारला जबाबदार धरण्याबाबत नव्या प्रशासनाला सावध राहण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

मुख्यमंत्री विजय यांच्या उद्घाटनपर भाषणानंतर लगेचच जारी केलेल्या निवेदनात स्टॅलिन यांनी नव्या सरकारने जाहीर केलेल्या तातडीच्या निर्णयांचे स्वागत केले. यामध्ये २०० युनिटपर्यंत मोफत वीज, महिला सुरक्षेसाठी विशेष पथके, अमली पदार्थविरोधी मोहिमा आणि प्रशासकीय सुधारणा यांसारख्या उपाययोजनांचा समावेश आहे.

विजय यांनी आपल्या भाषणात "मागील सरकारने राज्यावर सुमारे १० लाख कोटी रुपयांचे कर्ज टाकले असून सरकारी तिजोरी रिकामी केली," असा आरोप केला होता. त्यावर प्रतिक्रिया देताना स्टॅलिन म्हणाले की, तामिळनाडूवरील कर्ज हे वित्तीय नियमांनुसार परवानगी असलेल्या मर्यादेतच होते. स्टॅलिन यांनी स्पष्ट केले की, फेब्रुवारी महिन्यात सादर करण्यात आलेल्या राज्याच्या अर्थसंकल्पात आर्थिक परिस्थितीबाबत सविस्तर माहिती आधीच मांडण्यात आली होती. "लोकांनी तुम्हाला दिलेल्या मतांचा विश्वासघात होईल, अशा प्रकारे शासकीय जबाबदाऱ्यांवरून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करू नका," असा टोला त्यांनी लगावला.

त्यांनी म्हटले की, कोणत्याही सरकारला केवळ आर्थिक कारणांची सबब न सांगता "प्रशासकीय इच्छाशक्ती आणि प्रभावी शासन क्षमता" दाखवावी लागते. कोविड-१९ महामारी, पूरस्थिती आणि केंद्रातील भाजप सरकारकडून आर्थिक उपेक्षा अशा अनेक संकटांनंतरही द्रमुक सरकारने विविध कल्याणकारी योजना यशस्वीपणे राबवल्याचा दावा त्यांनी केला.

निवडणूक प्रचारादरम्यान विजय यांनी "व्यवहार्य आणि शक्य असलेलीच आश्वासने देऊ" असे सांगितल्याची आठवण करून देताना स्टॅलिन म्हणाले, "प्रचार आणि प्रत्यक्ष प्रशासन यात मोठा फरक असतो. जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करताना किती गुंतागुंत असते, हे पुढील काळात तुम्हालाही समजेल."

मुख्यमंत्री विजय यांनी पदभार स्वीकारल्यानंतरच्या पहिल्याच भाषणात पारदर्शक आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाचे आश्वासन दिले होते.

## व्यभिचाराचे मोघम घटस्फोटासाठी आरोप पुरेसे नाहीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पटना** : "पती असो वा पत्नी, व्यभिचाराचे केवळ मोघम आणि पुराव्याविना आरोप करून घटस्फोटाची मागणी करता येणार नाही. आरोपांमध्ये वेळ, ठिकाण आणि संबंधित व्यक्तीची स्पष्ट ओळख नसल्यास त्या आधारे घटस्फोट मंजूर केला जाऊ शकत नाही," असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत पाटणा उच्च न्यायालयाने पतीची घटस्फोटाची याचिका फेटाळून लावली.

न्यायमूर्ती नानी टागिया आणि न्यायमूर्ती आलोक कुमार पांडे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. यापूर्वी सिवन येथील कौटुंबिक न्यायालयाने २०१९ मध्ये पतीची घटस्फोट याचिका फेटाळली होती. त्या निर्णयाला पतीने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. वृत्तानुसार, पतीने आपल्या पत्नीवर विवाहबाह्य संबंधांचे आरोप केले होते. लग्नानंतर दोन वर्षांनी पत्नीच्या वागण्यात बदल झाला असून ती कुटुंबाला न सांगता बाहेर जात असल्याचा दावा त्याने केला होता. १५ ऑक्टोबर २०१२ रोजी पत्नी सकाळी घराबाहेर गेल्यानंतर रात्री परतली आणि दरम्यान ती एका अनोळखी व्यक्तीसोबत चित्रपटगृहातून बाहेर पडताना दिसल्याचा आरोपही पतीने केला होता. तसेच लग्नापूर्वीपासूनच तिचे त्या व्यक्तीसोबत प्रेमसंबंध असल्याचेही त्याने म्हटले होते. या आधारावर पतीने कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटासाठी याचिका दाखल केली होती. पत्नी न्यायालयात हजर न राहिल्याने सुनावणी एकतर्फी झाली होती. मात्र व्यभिचाराचे कोणतेही ठोस पुरावे सादर करण्यात आले नसल्याचे नमूद करत कौटुंबिक न्यायालयाने घटस्फोट देण्यास नकार दिला होता.

उच्च न्यायालयानेही कौटुंबिक न्यायालयाचा निर्णय कायम ठेवताना पतीच्या याचिकेतील गंभीर त्रुटींवर बोट ठेवले.

## भाजप विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड

## हिमंता सरमा पुन्हा आसामचे मुख्यमंत्री

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**गुवाहाटी** : हिमंता बिस्वा सरमा यांची रविवारी भाजप विधिमंडळ पक्ष तसेच एनडीए विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवड करण्यात आली. त्यामुळे नव्या सरकारमध्ये मुख्यमंत्री म्हणून त्यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. या बैठकीला भाजपचे केंद्रीय निरीक्षक जगत प्रकाश नड्डा आणि सह-निरीक्षक नायब सिंग सैनी उपस्थित होते.

निवड झाल्यानंतर बोलताना शर्मा यांनी सलग तिसऱ्यांदा भाजप नेतृत्वाखालील एनडीएला सत्तेत आणल्याबद्दल आसामच्या जनतेचे आभार मानले. "आसामचा विकास आम्ही कल्पनाही करू शकत नव्हतो अशा उंचीवर नेल्याबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो. निवडणुकीतील विजय हा त्यांच्या विकासात्मक उपक्रमांवरील जनतेच्या विश्वासाचे प्रतीक आहे," असे शर्मा म्हणाले.

भाजप, आसाम गण परिषद आणि बोडोलँड पीपल्स फ्रंट यांचा समावेश असलेल्या एनडीए सरकारचा मुख्य भर आसामच्या सातत्यपूर्ण विकासावर राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील शांतता आणि स्थैर्यासाठी त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचेही आभार मानले. एनडीएतील सर्व घटक पक्षांचे नेते लवकरच लोक भवन येथे राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य यांची भेट घेऊन सरकार स्थापनेचा दावा सादर करणार आहेत. शर्मा यांचा शपथविधी सोहळा १२ मे रोजी पार पडणार असून त्याला पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांच्यासह अनेक वरिष्ठ नेते उपस्थित राहणार आहेत.

मुख्यमंत्री म्हणून हा शर्मा यांचा सलग दुसरा कार्यकाळ असेल. २००१ मध्ये ते प्रथमच विधानसभेवर निवडून आले होते आणि त्यानंतर त्यांनी एकही निवडणूक गमावलेली नाही. त्यांनी काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री तरुण गोगोई यांच्या २००१ ते २०१६ या तिन्ही कार्यकाळात मंत्री म्हणून काम पाहिले होते. तरुण गोगोई यांच्या तिसऱ्या कार्यकाळात नेतृत्वाच्या प्रश्नावरून मतभेद निर्माण झाले आणि २०१५ मध्ये शर्मा यांनी काँग्रेसमधून बाहेर पडत भाजपमध्ये प्रवेश केला. त्यानंतर २०१६ मध्ये भाजपने आसाममध्ये प्रथमच सत्ता स्थापन केली. 'अहोरात्र काम करणारे नेते' अशी ओळख असलेले शर्मा हे कुशल रणनीतीकार मानले जातात. त्यांच्या नेतृत्वाखाली यंदाच्या विधानसभा निवडणुकीत एनडीएने १२६ पैकी तब्बल १०२ जागांवर विजय मिळवला.

## बंगालमध्ये भाजपच्या सरकारचा ऐतिहासिक क्षण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : सुवेंदू अधिकारी यांनी शनिवारी पश्चिम बंगाल चे पहिले भाजप मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. ब्रिगेड परेड मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य सोहळ्यात राज्यपाल आर. एन. रवी यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, विविध राज्यांचे मुख्यमंत्री तसेच एनडीएतील वरिष्ठ नेते उपस्थित होते.

भाजपसाठी हा शपथविधी केवळ सत्तास्थापनेचा कार्यक्रम नव्हता, तर बंगालच्या राजकीय इतिहासातील मोठा टप्पा मानला जात आहे. एकेकाळी डाव्या पक्षांचा वैचारिक बालेकिल्ला आणि नंतर तृणमूल काँग्रेस च्या शक्तिप्रदर्शनाचे केंद्र मानले जाणारे ब्रिगेड परेड मैदान भाजपच्या बंगालमधील पहिल्या सरकार स्थापनेचा साक्षीदार ठरले.

सकाळपासूनच हजारो भाजप कार्यकर्ते हातात कमळाचे झेंडे घेऊन कार्यक्रमस्थळी दाखल होत होते. मैदानावर मोठ्या एलईडी स्क्रीनवर पंतप्रधान मोदी आणि सुवेंदू अधिकारी यांच्या प्रचारसभांतील भाषणांचे प्रक्षेपण करण्यात येत होते. पंतप्रधान कार्यक्रमस्थळी पोहोचताच संपूर्ण मैदान 'भारत माता की जय'च्या घोषणांनी दुमदुमून गेले. ४ मे रोजी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने २९४ पैकी २०७ जागा जिंकत दणदणीत विजय मिळवला आणि राज्यात प्रथमच सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा केला. या ऐतिहासिक क्षणाचा प्रत्यक्ष साक्षीदार होण्यासाठी राज्यभरातून भाजप समर्थक मोठ्या संख्येने कोलकात्यात दाखल झाले होते.

कार्यक्रमाला उपस्थित असलेले कॉर्पोरेट कर्मचारी अप्रतिम घोष म्हणाले, "४ मे रोजी निकाल लागल्यापासून मी ब्रिगेड मैदानावरील हा ऐतिहासिक क्षण पाहण्याचे ठरवले होते. पास मिळवणे कठीण होते; मात्र अखेर शुक्रवारी रात्री पास मिळाला आणि पहाटेपासूनच मैदानावर आलो. हा अनुभव अविस्मरणीय आहे." अनेक कार्यकर्ते आणि समर्थक प्रवेशासाठी पास मिळावा म्हणून स्थानिक नेत्यांना फोन आणि व्हॉट्सअॅप संदेश पाठवत होते. पंतप्रधान मोदी, अमित शाह आणि इतर वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत होणारा हा भव्य सोहळा पाहण्यासाठी भाजप कार्यकर्त्यांमध्ये मोठी उत्सुकता होती.

## झारखंडच्या खुंटीमध्ये माओवाद्यांना अटक

**खुंटी** : झारखंडच्या खुंटी जिल्ह्यातून, बंदी घातलेल्या माओवादी फुटीर गट पीपल्स लिबरेशन फ्रंट ऑफ इंडियाच्या दोन सदस्यांना अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी दिली. जिलिंगा जंगलात टाकलेल्या छाप्यादरम्यान त्या दोघांना अटक करण्यात आली, असे त्यांनी सांगितले. अशी माहिती मिळाली की, पीएलएफआयचे सदस्य जिलिंगा जंगलात आपल्या संघटनेचा विस्तार करण्यासाठी आणि परिसरातून खंडणी गोळा करण्यासाठी जमले आहेत.

## सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नावाने खोटे व्यक्तव्य व्हायरल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : सोशल मीडियावर आपल्या नावाचा वापर करून पसरवण्यात येत असलेल्या एका खोट्या विधानाचा भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे. अत्यंत दुर्मिळ अशा थेट प्रतिक्रियेत त्यांनी संबंधित विधान पूर्णपणे बनावट असल्याचे स्पष्ट केले आहे.

सोशल मीडियावरील एका अकाउंटवर सरन्यायाधीशांच्या नावाने एक कथित विधान व्हायरल करण्यात आले होते. त्यामध्ये एका समाजाविषयी आक्षेपार्ह टिप्पणी करण्यात आली होती. हे विधान सरन्यायाधीशांनी केल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, त्याचा ठाम इन्कार करत त्यांनी हा प्रकार "घृणास्पद, निर्लज्ज आणि खोडसाळ" असल्याचे म्हटले आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले की, "बनावट विधान तयार करून ते देशातील सर्वोच्च न्यायिक पदाच्या नावावर खपवणे, हा अत्यंत अप्रामाणिकपणा, जाणूनबुजून केलेली सामाजिक प्रक्षोभकता आणि घटनात्मक मूल्यांचा अवमान आहे." त्यांनी म्हटले की, "असे बेजबाबदार वर्तन न्यायपालिकेवरील जनतेचा विश्वास आणि कायद्याच्या राज्याच्या मूळावरच घाला घालणारे आहे." संबंधित दावे पूर्णपणे खोटे, द्वेषपूर्ण आणि निराधार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## ब्रह्मपुत्रा मंडळाच्या पुनर्रचनेत सिक्कीम, पश्चिम बंगालचा समावेश

# नदी खोरे व्यवस्थापनाकडे केंद्राचा व्यापक दृष्टिकोन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने ब्रह्मपुत्रा मंडळ च्या उच्चाधिकार पुनरावलोकन मंडळाची (एचपीआरबी) पुनर्रचना करत त्यामध्ये प्रथमच सिक्कीम आणि पश्चिम बंगाल या राज्यांच्या प्रतिनिधींचा समावेश केला आहे. या निर्णयामुळे ब्रह्मपुत्रा नदी व्यवस्थापनाकडे केंद्र सरकार अधिक व्यापक आणि नदी खोरे आधारित दृष्टिकोनातून पाहत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

जलशक्ती मंत्रालय यांनी ९ मे रोजी जारी केलेल्या अधिसूचनेद्वारे ही पुनर्रचना करण्यात आली. यापूर्वी सिंचन मंत्रालयाने १९८२ मध्ये आणि जलसंपदा



मंत्रालयाने १९९२ मध्ये जारी केलेल्या अधिसूचनांची जागा ही नवी अधिसूचना घेणार आहे. या बदलामुळे अध्यक्षांसह मंडळातील सदस्यसंख्या १५ वरून १७ झाली आहे.

१९८० मध्ये स्थापन झालेल्या ब्रह्मपुत्रा मंडळाचे मुख्यालय गुवाहाटी येथे असून, ईशान्य भारतातील ब्रह्मपुत्रा आणि बराक नदी खोऱ्यांमधील नदी व्यवस्थापन, पूर नियंत्रण, सिंचन, जलविद्युत निर्मिती, विकास नियोजन आणि आंतरराज्यीय जलविषयक प्रश्नांवर हे मंडळ काम करते. मंडळात विविध राज्यांचे मुख्यमंत्री किंवा त्यांचे प्रतिनिधी, जलतज्ज्ञ, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि अभियंते यांचा समावेश असतो.

नव्या रचनेनुसार मंडळात आता आसाम, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, नागालँड, त्रिपुरा, मिझोराम, सिक्कीम आणि पश्चिम बंगाल या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांचे प्रतिनिधी सहभागी असतील. याशिवाय केंद्रीय अर्थ मंत्रालय, जलशक्ती मंत्रालय, ऊर्जा मंत्रालय, कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय तसेच बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालय यांचे प्रतिनिधीही मंडळात असतील. तसेच केंद्रीय जल आयोग चे अध्यक्ष, जलसंपदा विभागाचे सचिव आणि ब्रह्मपुत्रा मंडळाचे अध्यक्ष हेही प्रमुख सदस्य राहतील.

तज्ज्ञांच्या मते, सिक्कीम आणि पश्चिम बंगालचा समावेश हा भारताच्या जलव्यवस्थापन धोरणातील महत्त्वपूर्ण बदल मानला जात आहे. आतापर्यंत ब्रह्मपुत्रा नदी व्यवस्थापन प्रामुख्याने आसाम आणि त्याच्या शेजारील ईशान्येकडील राज्यांपुरते मर्यादित होते. मात्र आता केंद्र सरकार नदी व्यवस्थापनाकडे स्वतंत्र राज्यनद्यांऐवजी परस्परांशी जोडलेल्या नदी प्रणालीच्या स्वरूपात पाहू लागले आहे.

विशेषतः सिक्कीम मधून उगम पावणारी तीस्ता नदी ही ब्रह्मपुत्रा नदी प्रणालीशी जलशास्त्रीयदृष्ट्या जोडलेली मानली जाते. तसेच तीस्ता आणि तिच्या उपनद्या पश्चिम बंगाल मधून वाहत बांगलादेश मध्ये प्रवेश करतात. त्यामुळे या दोन्ही राज्यांचा सहभाग नदी खोरे व्यवस्थापनासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

पूर नियंत्रण, हवामान बदल, नदीक्षरण, सिंचन आणि जलविद्युत निर्मिती यांसारख्या वाढत्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय भविष्यातील राष्ट्रीय जलनीतीतील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.